!! श्री !!

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## सांसद आदर्श ग्राम पालखेड येथे विशेष प्रचार कार्यक्रमांचे आयोजन

संभाजीनगर दि ५– केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालय अंतर्गत कार्यरत क्षेत्रीय प्रचार कार्यालयातर्फे वैजापुर तालुक्यातील पालखेड येथे ६ जुलै रोजी विषेश प्रचार कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. पालखेड हे गाव शिवसेना उपनेते तथा खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांसद आदर्श ग्राम योजने अंतर्गत दत्तक घेतले असून, कार्यक्रमाचे उद्घाटन शनिवारी सकाळी १० वाजता खासदार चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमा अंतर्गत पालखेड येथील रस्त्यांचे भूमिपुजन, कडबा कट्टी यंत्राचे वाटप जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्रिय योजनांचा लाभार्थ्यांना धनादेशाचे वाटप, बचत गट, सकस आहार, मोफत आरोग्य शिबीर, विविध योजनांची माहिती देणारे प्रदर्शन, व्याख्याने, प्रश्नमंजुषा, स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके वितरण असे अनेक उपक्रम राबविण्यात येणार आहेत. पोस्ट खात्यातर्फे कन्या समृध्दी योजना, राष्ट्रीयकृत बँकांच्या योजना, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या आरोग्य विभाग, कृषी विभाग, पशु संवर्धन विभाग, महिला व बालकल्याण विभागाच्या योजना, आरोग्य विभागाच्या योजना यांवरही व्याख्याने व प्रदर्शन भरवण्यात येणार आहे. शिवाय उपस्थितांच्या शंकांचे निरसन करण्यात येईल. या सर्व उपक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन क्षेत्रिय प्रचार कार्यालय, जिल्हा प्रशासन व शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी केले आहे.

प्रसिध्दी प्रमुख

योगेश पायघन / गणेश वाघ.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : (०२४०) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : (०२४०) २३४३०२५

cbkhaire@gmail.com yp4329@gmail.com 8421415255/7769052525